**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ३०/२०१६-१७/२०१ दिनांक: २४-११-२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. ३०/२०१६-२०१७**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मे.श्री विरभद्र प्रोसेसर्स पार्टनर<br>श्री धोंडीराम म. कस्तुरे १५/२२६ इंडस्ट्रियल इस्टेट<br>इचलकरंजी , ता. हातकणंगले, जिल्हा. कोल्हापूर | : | **तक्रार<br>अर्जदार<br>(ग्राहक)** |
| | **विरुध्द** | | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी | | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग इचलकरंजी ग्रामिण | | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहीर करीत आहे.

१) तक्रारदार यांनी , त्यांच्या अगोदरचे वीज ग्राहक श्री कस्तुरे धोंडीराम महादेव यांचेकडून येणे असणारी थकबाकी रु. २३,७४०/- वसूलीस पात्र नाही आणि ती अन्यायकारक असल्याचे या मंचाने ठरवावे अशी मागणी या गा-हाणे अर्जात केली आहे.

२) वि.प. यांचे लेखी निवेदन प्राप्त झाल्यानंतर हे प्रकरण सुनावणीस आज नेमणेत आले आहे. तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री विनोद कांबळे ऊपस्थित नाहीत. परंतु त्यांनी आज लेखी म्हणणे सादर केले आहे.

३) दि. २२-११-२०१६ रोजी वि.प.तर्फे एक लेखी पत्र दाखल केले असून त्यामध्ये असे स्पष्टपणे कळविले आहे की, तक्रारदार यांच्या जागेवरती जुन्या नावाने श्री कस्तुरे धोंडीबा महादेव (ग्राहक क्रमांक २५०३८००७०३९८ ) यांची काल्पनिक थकबाकी रु. २४,८४५/- इतकी कमी केली असून कस्तुरे धोंडीबा महादेव यांचेकडून येणे थकबाकी निंरक (शून्य) आहे.

४) वर परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या वि.प. यांच्याकडील दिनांक १९-११-२०१६ च्या पत्रानुसार, वि.प. यांना कोणतीही थकबाकी तक्रारदार यांचेकडून येणे नसल्यामुळे हे प्रकरण खालील प्रमाणे आदेश देऊन निकाली काढणेत येत आहे.

**आदेश**

१) विरुध्द पक्षकार - वितरण कंपनी यांनी तक्रारदार - मे श्री विरभद्र प्रोसेसर्स - यांचे विरुध्द श्री धोंडीराम महादेव कस्तुरे यांची कथित थकबाकी वसूल करणेसाठी सुरु केलेली कारवाई रद्द करण्यात येत आहे. या थकबाकीच्या कारणावरुन तक्रारदार यांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येऊ नये असे वि.प. यांना सूचित करण्यात येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |